नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १८१ Issue - 181 | वार - शनिवार दि. २८ नोव्हेंबर २०२६ Blow- Saturday Date 28 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

डीलिमिटेशन विधेयकाला कॅबिनेटची मंजुरी, ५० टक्के जागा वाढणार

मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षण विधेयकाला केंद्रीय कॅबिनेटची मंजुरी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत लोकसभेच्या जागांमध्ये ५० टक्क्यांनी वाढ करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे देशातील लोकसभेच्या जागांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जागांची ही सुधारित कमाल मर्यादा २०५० पर्यंत कायम ठेवण्याचा प्रस्ताव आहे. संसदेच्या ३० नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या विशेष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या अधिवेशनात सरकारकडून महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचनेशी संबंधित विधेयकात महत्त्वपूर्ण बदल मांडले जाण्याची शक्यता आहे.



लोकसभेच्या जागांमध्ये ५० टक्क्यांनी वाढ

केंद्रीय मंत्रिमंडळाने सर्व राज्यांमधील लोकसभेच्या जागा ५० टक्क्यांनी वाढवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या प्रस्तावानुसार, सध्याच्या लोकसभेच्या जागांमध्ये ५० टक्क्यांची भर पडणार आहे. ही सुधारित कमाल मर्यादा २०५० पर्यंत लागू राहणार असल्याचे सांगितले जात आहे. यापूर्वी लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांची संख्या वाढवून ८५० करण्याचा प्रस्ताव चर्चेत होता. आता सर्व राज्यांमध्ये जागा वाढवण्याच्या नव्या सूत्रामुळे राजकीय समीकरणांमध्येही मोठे बदल होण्याची शक्यता आहे.

दक्षिणेकडील राज्यांच्या चिंता दूर करण्याचा प्रयत्न

मतदारसंघ पुनर्रचनेच्या मुद्द्यावरून दक्षिण भारतातील राज्यांनी चिंता व्यक्त केली होती. लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यास लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवलेल्या दक्षिणेकडील राज्यांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व कमी होण्याची भीती व्यक्त केली जात होती. हीच बाब लक्षात घेऊन सर्व राज्यांमध्ये लोकसभेच्या जागा ५० टक्क्यांनी वाढवण्याचा पर्याय पुढे आल्याचे मानले जात आहे.

यापूर्वीच्या चर्चेनुसार, १९७१ च्या जनगणनेच्या आधारे राज्यांचा लोकसभेतील सध्याचा आंतरराज्यीय वाटा कायम ठेवून जागांमध्ये ५० टक्क्यांची वाढ करण्याच्या सूत्रावर सरकार विचार करत होते. त्यामुळे दक्षिणेकडील राज्यांचे प्रतिनिधित्व सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

महिला आरक्षण विधेयकात मोठ्या बदलांची तयारी

लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या उद्देशाने सरकार महिला आरक्षण कायद्यात दुरुस्ती करण्याच्या तयारीत आहे. यापूर्वी एप्रिलमध्ये लोकसभेत संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, २०२६ मंजूर होऊ शकले नव्हते. त्यामुळे आता सरकारकडून नव्या बदलांसह विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे.

यापूर्वीच्या विधेयकात महिला आरक्षणाची अंमलबजावणी मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडण्यात आली होती. तसेच लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांची संख्या वाढवून कमाल ८५० करण्याचा प्रस्ताव होता. आता जागांमध्ये ५० टक्क्यांनी वाढ करण्याच्या प्रस्तावामुळे

(पान २ वर...)

...तर अवैध होर्डिंग लावणाऱ्यांच्या पुरस्कार यादीत माझेही नाव टाका !

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



फडणवीसांची पुणे मनपाच्या कारवाईला दाद; पुणेरी शैलीतील उपक्रमाचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

मुंबई : पुणे शहरातील अवैध होर्डिंग आणि अतिक्रमणांविरोधात महापालिका प्रशासनाने सुरू केलेल्या कारवाईचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले. अवैध होर्डिंग लावणाऱ्यांची नावे 'पुरस्कार यादी'च्या स्वरूपात जाहीर करण्याच्या महापालिकेच्या पुणेरी शैलीतील उपक्रमावर त्यांनी मिश्कील टिप्पणीही केली. 'उद्या माझ्या नावाचेही अवैध होर्डिंग लावले, तर पुरस्कारांच्या यादीत माझेही नाव जाहीर करा,' असे फडणवीस म्हणाले.

पुण्यातील अतिक्रमण आणि अवैध होर्डिंगविरोधातील कारवाईबद्दल महापालिका प्रशासनाचे अभिनंदन करताना फडणवीस म्हणाले, सार्वजनिक जागांचा वापर नागरिकांना योग्य पद्धतीने करता आला पाहिजे. रस्त्यांवर वाहनचालकांबरोबरच पादचाऱ्यांनाही पुरेशी जागा मिळणे आवश्यक आहे. नियम हे फक्त सरकारी आदेश आणि कागदपत्रांपुरते मर्यादित नसून त्यांचे प्रत्यक्ष पालन झाले पाहिजे. सामान्य नागरिकांचे जीवन अधिक सुलभ करणे, हा नियमांचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

अवैध होर्डिंगची समस्या एकट्या पुण्यापुरती मर्यादित नसून देशभरातील शहरांसमोरील आव्हान आहे. त्यामुळे त्याविरोधात सातत्याने आणि नियमित कारवाई होणे आवश्यक आहे. पुणे महापालिकेने यासाठी स्वीकारलेली अनोखी आणि वास्तववादी पुणेरी पद्धत कौतुकास्पद असल्याचे फडणवीस म्हणाले.

दरम्यान, आगामी काळात नागपूर येथे विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन होणार आहे. या काळात नागपूरमध्येही अवैध होर्डिंग लावण्याची स्पर्धा सुरू होण्याची शक्यता मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. त्यामुळे नागपूर प्रशासनाने आतापासूनच जनजागृती मोहीम सुरू करावी आणि शहराचे विद्रूपीकरण रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या.

पुणे महापालिकेने अवैध होर्डिंगविरोधातील कारवाईदरम्यान आपल्या 'एक्स' खात्यावरून पुणेरी शैलीत पोस्ट प्रसिद्ध केल्या होत्या. सुरुवातीला सत्ताधारी भाजपच्या नेत्यांची नावे 'पुरस्कार यादी'त जाहीर करण्यात आली. त्यानंतर महापौर, विरोधी पक्षनेते आणि विविध गटांच्या नेत्यांच्या होर्डिंगवरही उपरोधिक टिप्पणी करण्यात आली. या पोस्टमुळे महापालिका अधिकारी आणि राजकीय पदाधिकाऱ्यांमध्ये वादाची स्थिती निर्माण झाली होती. आता मुख्यमंत्र्यांनी या उपक्रमाचे समर्थन केल्याने हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे.

दक्षिणेत पावसाचा तडाखा, उत्तरेत दाट धुक्याचा कहर!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



नवी दिल्ली : देशातील हवामानात पुन्हा एकदा मोठा बदल होण्याची चिन्हे दिसत असून, भारतीय हवामान विभागाने नोव्हेंबर अखेर ते २ डिसेंबर या कालावधीसाठी सविस्तर हवामानाचा अंदाज जाहीर केला आहे. दक्षिण भारतातील अनेक राज्यांमध्ये पावसासह वादळी वाऱ्यांचा जोर कायम राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच अंदमान आणि निकोबार बेटांवर ३० नोव्हेंबर आणि १ डिसेंबर रोजी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे, उत्तर आणि पूर्व भारतातील अनेक राज्यांमध्ये दाट धुक्याची चादर पसरण्याचा अंदाज असून, पूर्व राजस्थानच्या काही भागांत शीतलहरीचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार किनारपट्टी आंध्र प्रदेश, यानम, रायलसीमा, तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल या भागांत २ डिसेंबर पर्यंत अधूनमधून पाऊस पडण्याची शक्यता आहे. केरळ आणि माहे येथे २९ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यानही पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज आहे.

पावसासोबतच दक्षिण भारतातील काही भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वादळी वारे वाहण्याचा इशारा देण्यात आला आहे. आंध्र प्रदेश, यानम, केरळ, माहे, लक्षद्वीप, रायलसीमा आणि तमिळनाडू-पुद्दुचेरीमध्ये ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहू शकतात, तर काही ठिकाणी वाऱ्यांचा वेग ताशी ५० किमी पर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर २९ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान पावसाचा विस्तार वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः ३० नोव्हेंबर आणि १ डिसेंबर रोजी काही भागांत मुसळधार पावसासह विजांचा कडकडाट आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहू शकतात. त्यामुळे दृश्यमानता कमी होऊन प्रवासात अडथळे येण्याची शक्यता असल्याने वाहनचालकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

जिल्हा बँकेला पुन्हा सोनेरी दिवस आणणार; एक-एक रुपयाची वसुली करणार : पालकमंत्री जयकुमार गोरे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



सोलापूर : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत भाजपला मिळालेल्या यशानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मतदारांचे आभार मानले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक लढविण्याची परवानगी देऊन पाठबळ दिल्याबद्दल त्यांनी विशेष आभार व्यक्त केले. हा जिल्हा देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या नेतृत्वावर विश्वास ठेवतो. सलग पाच निवडणुकांमध्ये भाजपला यश मिळाले असल्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्हा बँकेला आर्थिक अडचणीत आणण्यासाठी जबाबदार कोण होते, असा सवाल उपस्थित करत गोरे म्हणाले की, बँकेतील गैरव्यवहारांच्या संदर्भात कलम ८८ ची माहिती घेतली आहे. दोषींवर आवश्यक ती कारवाई केली जाईल. बँकेचे थकीत पैसे एक-एक रुपया वसूल केले जातील. बँकेला अडचणीत आणणाऱ्यांनीही निवडणुकीत पॅनल उभे केले होते, असा टोलाही त्यांनी लगावला.

आता निवडणुकीचे राजकारण संपले असून, बँकेला पुन्हा सोनेरी दिवस मिळवून देणे हेच आमचे ध्येय आहे. बँकेची मालकी शेतकऱ्यांची आहे. त्यामुळे चुकीच्या गोष्टी दुरुस्त करून बँकेत शिस्त आणली जाईल. कर्ज घेऊन परतफेड न करणाऱ्यांकडून वसुली करताना कोणताही प्रेम किंवा लोभ आड येऊ दिला जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

नवीन संचालक मंडळ हे युवा नेतृत्वाचे असून प्रशांत परिचारक यांचा अनुभव वगळता बहुतांश संचालकांची ही पहिलीच टर्म आहे. काहींनी क्रॉस व्होटिंगचे स्वप्न पाहिले होते, तर काहींना गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीप्रमाणे निकाल लागेल असे वाटत होते. मात्र, अखेर यश आमचेच झाले, असे गोरे म्हणाले.

मनीष देशमुख यांच्या निवडणुकीचा अनुभव सांगताना त्यांनी अटीतटीची लढत होईल, असा अंदाज व्यक्त केला होता. या निवडणुकीतून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. कोणाकडे जबाबदारी द्यावी आणि काय निर्णय घ्यावेत, याचा अनुभव मिळाला. 'मौका सबको मिलता है,' असे सांगत त्यांनी राजकीय विरोधकांनाही टोला लगावला.

काही लोक दुसऱ्यांची गंमत करत होते; मात्र शेवटी त्यांचीच गंमत झाल्याचेही त्यांनी सांगितले. तालुकानिहाय मतदान झाले असून, मोहिते-पाटील पॅनलला कोणी मदत केली, हेही लवकरच स्पष्ट होईल, असे ते म्हणाले. बँकेच्या चेअरमन पदाबाबत लवकरच सर्वजण एकत्र बसून निर्णय घेतला जाईल. तसेच सोलापूर महानगरपालिकेच्या कामकाजाचा आठ दिवसांत आढावा घेणार असल्याचेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्पष्ट केले.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे, आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार दिलीप माने, राजन पाटील, प्रशांत परिचारक, दीपक साळुंखे-पाटील, राम सातपुते, विजयी उमेदवार मनीष देशमुख, रणजीत शिंदे, महादेव कांबळे, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, रणवीर राऊत, दिग्विजय बागल आदी उपस्थित होते.

१९ संचालक मंडळ सदस्यांपैकी तब्बल १८ जागांवर दणदणीत विजय!; स्वाभिमानी शेतकरी सहकार पॅनलला १ जागा

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत भाजप प्रणित सहकार विकास पॅनलची एकहाती सत्ता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर (प्रतिनिधी) : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निकालाचे चित्र आता स्पष्ट झालं आहे.१९ संचालक मंडळ सदस्यांपैकी तब्बल १८ जागावर भाजप प्रणित पॅनलचे उमेदवार विजयी झाले आहे. तर केवळ एका जागेवर मोहिते पाटील प्रणित पॅनलच्या उमेदवाराला विजय मिळवता आलाय.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत भाजप प्रणित सहकार विकास पॅनलने जोरदार मुसंडी मारत ९ पैकी ८ जागेवर भाजप प्रणित सहकार विकास पॅनलच्या उमेदवारांनी विजय मिळवला आहे.

तर अवघ्या एका जागेवर मोहिते पाटील प्रणित स्वाभिमानी शेतकरी सहकार पॅनलला यश मिळवता आलं आहे. तर शेवटच्या टप्प्यात फक्त एका जागेवर भाजप आणि मोहिते पाटील गटात मोठी चुरस पाहायला मिळाली. मात्र त्यातही भाजप उमेदवार मनीष देशमुख यांनी अमोल शिंदे यांच्या पराभव करत भाजपची एकहाती सत्ता राखली आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी २५ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या एका वृत्तानुसार १९ जागा जिंकण्याचा दावा केला होता. तसेच



'एक-दोन जागा वगळता इतर सर्व जागा निवडून येतील', असं विधान केलं होतं. पालकमंत्र्याचं हे विधान सत्य झालं असून १९ पैकी १८ जागांवर भाजप पुरस्कृत 'सहकार विकास पॅनल'चे उमेदवार निवडून आले आहेत. मोहिते-पाटलांनी माळशिरसचा गड राखला आहे.

माळशिरस कार्यकारी सोसायटीतून अर्जुनसिंह मोहिते-पाटील विजयी झाले आहेत. मोहिते-पाटील पुरस्कृत 'स्वाभिमानी शेतकरी विकास पॅनल'चा फक्त एकच उमेदवार निवडून आला आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक विजयी उमेदवार

भाजप पॅनल (एकूण - १८)

बिनविरोध

राजेंद्र राऊत : बार्शी वि. सोसा.

प्रशांत परिचारक : पंढरपूर वि. सोसा.

विक्रांत (बाळराजे) पाटील : मोहोळ वि. सोसा.

सिद्धेश्वर आवताडे : मंगळवेढा वि. सोसा.

यशराज शिंदे : माढा वि. सोसा.

श्रीदीप हसापुरे : दक्षिण सोलापूर वि. सोसा.

पृथ्वीराज माने : उत्तर सोलापूर वि. सोसा.

शंभूराजे जगताप : करमाळा वि. सोसा.

सचिन कल्याणशेट्टी : अक्कलकोट वि. सोसा.

अजिंक्यराणा पाटील : ओबीसी निवडणुक झालेल्या ९ जागाचे विजयी उमेदवार :-

बाबासाहेब देशमुख : (सांगोला वि. सो.)

अर्चना घाडगे : (महिला)

शामल बागल : (महिला)

राजेंद्र बंदीछोडे : (इतर भटक्या जा.)

रणजितसिंह शिंदे : (कृषी व प्रक्रिया)

मनीष देशमुख : (बँक व पतसंस्था)

सूर्यादित्य साळुंखे : (दुग्ध विकास)

महादेव कांबळे : (अनुसूचित जाती)

संपादकीय....

गरजूंना नवा आधार

मुख्यमंत्री सहायता निधीची सोशल स्टॉक एक्सचेंजवर नोंदणी करण्यात आली आहे. या नव्या व्यासपीठामुळे कॉर्पोरेट कंपन्या, फाउंडेशन आणि देणगीदारांकडून अधिक निधी उभारता येणार असून, गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग अधिक व्यापक होणार आहे. आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही गरजू रुग्णाचे उपचार थांबू नयेत, या उद्देशाने काम करणाऱ्या मुख्यमंत्री सहायता निधीला आता निधी उभारणीसाठी नवं व्यासपीठ मिळालं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार या निधीची नोंदणी आता सोशल स्टॉक एक्सचेंजवर करण्यात आली आहे. त्यामुळे गरजू रुग्णांसाठी अधिक निधी उपलब्ध होण्याची आशा निर्माण झाली आहे. मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून हृदयरोग, कर्करोग, किडनी विकार, यकृत विकार, मेंदूविकार आणि इतर गंभीर आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना आर्थिक मदत दिली जाते. मात्र गेल्या काही वर्षांत मदतीसाठी अर्ज करणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे वाढत्या गरजेसाठी अतिरिक्त निधीची गरज भासू लागली होती. सोशल स्टॉक एक्सचेंजमुळे या निधी उभारणीला अधिक व्यापक स्वरूप मिळणार आहे. सोशल स्टॉक एक्सचेंज म्हणजे नेमकं काय, असा प्रश्न अनेकांना पडेल. सामान्य शेअर बाजारात कंपन्यांचे शेअर्स खरेदी-विक्री होतात. तर सोशल स्टॉक एक्सचेंजमध्ये सामाजिक आणि लोककल्याणकारी कामांसाठी निधी उभारला जातो. राष्ट्रीय शेअर बाजार आणि बॉम्बे स्टॉक एक्सचेंजवर सेबीच्या नियमनाखाली हे व्यासपीठ काम करतं. पात्र ना-नफा संस्था येथे नोंदणी करून झिरो कूपन झिरो प्रिन्सिपल या माध्यमातून निधी उभारू शकतात. देणगीदारांना सामाजिक कामात योगदान देण्याची ही एक पारदर्शक संधी असते. या नव्या व्यवस्थेमुळे मुख्यमंत्री सहायता निधीला अनेक फायदे होणार आहेत. पहिला फायदा म्हणजे निधी उभारणीची नवी संधी उपलब्ध होईल. दुसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधी देणाऱ्या कंपन्या, मोठे देणगीदार, फाउंडेशन आणि सामाजिक गुंतवणूकदार यांच्यापर्यंत थेट पोहोचता येईल. विशेषतः कर्करोग, हृदयरोग, किडनी आणि यकृत प्रत्यारोपण, दुर्मिळ आजार यांसारख्या महागड्या उपचारांसाठी याचा मोठा फायदा होईल.

दिवसाला २ रुपये कमावणारी मुलगी बनली कोट्यवधींच्या उद्योगविश्वाची मालकीण!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कधीकाळी दिवसाला अवघे दोन रुपये मिळवण्यासाठी काम करणारी एक मुलगी पुढे मोठ्या उद्योगाच्या पुनरुज्जीवनाची जबाबदारी स्वीकारते. ज्या कंपनीला मोठमोठे गुंतवणूकदार हात लावायला तयार नव्हते, त्या कंपनीला पुन्हा उभे करण्याचे धाडस दाखवते. ही एखाद्या चित्रपटाची कथा नाही. ही महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील रोपरखेडा गावात जन्म लेल्या कल्पना सरोज यांची खरी जीवनकहाणी आहे.

अकोल्यातील छोट्या गावातून सुरू झालेला प्रवास

कल्पना सरोज यांचा जन्म महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील रोपरखेडा या गावात झाला. त्यांचे वडील पोलीस खात्यात नोकरीला होते. घरची परिस्थिती साधारण होती. वडिलांची इच्छा होती की मुलीने शिक्षण घ्यावे आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे.

कल्पना यांचे लग्न वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी झाले. शिक्षण सुरू असतानाच त्यांना सासरी जावे लागले. तिथे त्यांना अत्यंत कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला. सुमारे सहा महिन्यांनंतर वडील त्यांना माहेरी घेऊन आले.

गावात परतल्यानंतर त्यांना सामाजिक टोमणे आणि अपमान सहन करावा लागला. मात्र त्यांच्या वडिलांनी त्यांना पुन्हा शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. पुढे त्यांनी दहावीपर्यंत शिक्षण घेतले. आयुष्यात काहीतरी करून दाखवायचे, ही जिद्द त्यांच्या मनात कायम राहिली.

दिवसाला दोन रुपये मिळणाऱ्या नोकरीपासून सुरुवात

गावातील परिस्थिती बदलत नसल्याचे पाहून कल्पना यांनी मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला. मुंबईत त्यांना सुरुवातीला एका होजिअरी कंपनीत काम मिळाले. तिथे त्यांना दिवसाला दोन रुपये मिळत होते.

शिवणकामाचे कौशल्य त्यांना आधीपासून होते. सुरुवातीला मशीनवर काम करताना अडचणी आल्या. त्यामुळे काही काळ त्या मदतनीस म्हणून काम करू लागल्या. मात्र काम शिकण्याची तयारी आणि मेहनत यामुळे पुढे त्यांना कुशल कामगार म्हणून काम मिळाले. त्यांचे मासिक उत्पन्न वाढून सुमारे २२५ रुपयांपर्यंत पोहोचले. त्या काळात ही रक्कम त्यांच्यासाठी मोठी होती.

दरम्यान, त्यांनी आपल्या कुटुंबाची जबाबदारी स्वीकारली. मुंबईजवळील कल्याण येथे भाड्याने घर घेऊन आई-वडील आणि भावंडांना सोबत आणले. स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्या काम करत राहिल्या.



५० हजार रुपयांच्या कर्जातून व्यवसायाची सुरुवात

नोकरी करताना कल्पना यांना एक गोष्ट लक्षात आली. दुसऱ्यांसाठी कितीही मेहनत केली तरी उत्पन्नाला मर्यादा असते. स्वतःचा व्यवसाय असेल तर इतरांनाही रोजगार देता येऊ शकतो. सरकारी कर्ज योजनेची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी ५० हजार रुपयांचे कर्ज घेतले. या पैशातून शिवणकामासाठी मशीन खरेदी केली. त्या बुटीक आणि कपड्यांच्या दुकानांकडून काम घेऊ लागल्या. अनेकदा दिवसाचे १६ ते १८ तास काम करून त्यांनी स्वतःचा व्यवसाय वाढवला.

शिवणकामाच्या व्यवसायातून अनुभव आणि उत्पन्न मिळाल्यानंतर त्यांनी फर्निचर व्यवसायातही प्रवेश केला. त्यानंतर बांधकाम आणि रिअल इस्टेट क्षेत्रात संधी शोधण्यास सुरुवात केली.

कमानी ट्यूब्सची जबाबदारी स्वीकारण्याचे धाडस

कल्पना सरोज यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे कमानी ट्यूब्स लिमिटेड या कंपनीचे पुनरुज्जीवन. कमानी ट्यूब्स ही १९५९ मध्ये स्थापन झालेली औद्योगिक कंपनी आहे. तांबे आणि इतर अलौह धातूंपासून ट्यूब्स, पाईप्स आणि संबंधित उत्पादने तयार करण्याचे काम ही कंपनी करत होती.

एकेकाळी नावाजलेली ही कंपनी कामगारांच्या प्रश्नांमुळे आणि आर्थिक अडचणींमुळे संकटात सापडली. १९८८ मध्ये कंपनीचे व्यवस्थापन कामगारांकडे सोपवण्यात आले. पुढे आर्थिक परिस्थिती आणखी बिघडली आणि १९९५ मध्ये कंपनी आजारी उद्योग म्हणून नोंदली गेली.

कंपनीवर मोठे कर्ज होते. कामगारांचे पगार आणि भविष्य निर्वाह निधीची देणी थकली होती. अनेक कायदेशीर प्रकरणेही प्रलंबित होती. त्यामुळे कंपनी ताब्यात घेण्यास अनेक जण तयार नव्हते. अशा वेळी कंपनीतील कामगारांनी कल्पना सरोज यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी कंपनीची परिस्थिती समजून घेतली आणि ती पुन्हा उभी करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

२००६ मध्ये कंपनीच्या पुनरुज्जीवनाची त्यांची योजना मान्य झाली. कर्जदारांचे दावे निकाली काढणे, कामगारांची देणी भागवणे आणि उत्पादन पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक व्यवस्था उभी करणे, अशी मोठी जबाबदारी त्यांच्यासमोर होती.

संकटातून कंपनीला पुन्हा उभे केले

कमानी ट्यूब्सचे पुनरुज्जीवन करताना त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. कंपनीची जुनी उत्पादन व्यवस्था, आर्थिक देणी, कामगारांचे प्रश्न आणि कारखान्याच्या स्थलांतराची प्रक्रिया या सर्व गोष्टी एकाच वेळी हाताळाव्या लागत होत्या.

कंपनीचा कारखाना कल्याण परिसरातून वाडा येथे हलवण्याची प्रक्रिया करण्यात आली. पावसामुळे कारखान्याच्या उभारणीला अडथळे आले. त्यामुळे पुन्हा नियोजन करावे लागले.

कामगारांची थकीत देणी, बँकांची देणी आणि उत्पादन सुरू करण्यासाठी लागणारा निधी यांचा समतोल साधणे हे मोठे आव्हान होते. कल्पना सरोज यांनी या प्रक्रियेत सातत्य ठेवले. २०११ मध्ये कमानी ट्यूब्स कंपनी आजारी उद्योगांच्या पुनर्रचना प्रक्रियेतून बाहेर पडली. कंपनीला पुन्हा स्वतंत्रपणे काम करण्याचा मार्ग मोकळा झाला.

या यशामुळे कल्पना सरोज यांचे नाव देशभरातील उद्योगविश्वात चर्चेत आले. एका छोट्या गावातून आलेल्या महिलेने संकटात सापडलेल्या जुन्या औद्योगिक कंपनीला पुन्हा उभे केले होते.

केवळ एक कंपनी नव्हे, तर अनेक क्षेत्रांत काम

कमानी ट्यूब्सपुरतेच त्यांचे कार्य मर्यादित राहिले नाही. बांधकाम, औद्योगिक उत्पादन, साखर उद्योग आणि इतर व्यावसायिक क्षेत्रांतही त्यांनी काम केले. त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ व्यवसायाची संधी शोधणे नव्हे, तर अडचणीत असलेल्या व्यवसायाला नव्याने उभे करण्याची तयारी दाखवणे.

त्यांच्या प्रवासात आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे रोजगार आणि महिला सक्षमीकरणाविषयीची भूमिका. स्वतः आर्थिक अडचणी अनुभवल्यामुळे रोजगाराच्या संधींचे महत्त्व त्यांना चांगले माहीत आहे. त्यामुळे सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांनी सहभाग घेतला.

पद्मश्री आणि नारी शक्ती पुरस्काराने सन्मान

उद्योगक्षेत्रातील योगदानाची दखल घेत भारत सरकारने २०१३ मध्ये कल्पना सरोज यांना व्यापार आणि उद्योग क्षेत्रासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले.

२०१९ मध्ये त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते नारी शक्ती पुरस्कारही प्रदान करण्यात आला. हा सन्मान महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि समाजातील त्यांच्या योगदानासाठी दिला जातो. या पुरस्कारांमुळे त्यांच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली. मात्र त्यांच्या यशाची खरी ओळख पुरस्कारांपेक्षा त्यांनी उभ्या केलेल्या व्यवसायातून आणि घेतलेल्या जबाबदाऱ्यांम धून दिसते.

आजची परिस्थिती आणि पुढील वाटचाल

कमानी ट्यूब्सच्या कंपनीविषयक माहितीनुसार कल्पना सरोज या कंपनीच्या नेतृत्वाशी संबंधित आहेत. कंपनी मुंबईत मुख्यालय आणि पालघर जिल्ह्यातील वाडा परिसरात उत्पादन प्रकल्प चालवते.

आज कंपनी तांबे, ब्रास आणि इतर धातूंच्या औद्योगिक उत्पादनांशी संबंधित व्यवसाय करते. पायाभूत सुविधा, औद्योगिक उपकरणे आणि विविध उत्पादन क्षेत्रांसाठी अशा धातूंच्या उत्पादनांना मागणी असते.

त्यांच्या प्रवासाकडे पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. मोठा उद्योग उभा करण्यासाठी नेहमीच मोठा कौटुंबिक वारसा किंवा तयार व्यवसाय मिळणे आवश्यक नसते. योग्य वेळी संधी ओळखणे, जोखीम स्वीकारणे आणि अडचणींमध्येही निर्णय घेण्याची क्षमता असणे महत्त्वाचे असते.

कल्पना सरोज यांची कथा प्रत्येकाला उद्योगपती बनण्याची हमी देत नाही; पण परिस्थिती कितीही कठीण असली तरी स्वतःचे आयुष्य बदलण्याचा प्रयत्न करता येतो, हे नक्की शिकवते.

आज महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील एखादी तरुणी छोट्या व्यवसायाचा विचार करत असेल, तर कल्पना सरोज यांचा प्रवास तिच्यासाठी प्रेरणेचा स्रोत ठरू शकतो.

शून्यातून सुरुवात करून स्वतःचे स्थान निर्माण करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येकासाठी ही कहाणी एक महत्त्वाचा धडा आहे. तुमच्या मते कल्पना सरोज यांच्या यशामागे सर्वात मोठे कारण कोणते – मेहनत, धाडसी निर्णय की योग्य वेळी संधी ओळखण्याची क्षमता?

– विजय शंकर घनघाव मुंबई
संपादक (८४८३०००८३१)

डीलिमिटेशन विधेयकाला कॅबिनेटची मंजुरी, ५० टक्के जागा वाढणार

(पान १ वरून...) महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबतही महत्त्वाचे बदल होऊ शकतात.

संसदेचे विशेष अधिवेशन कधीपासून?

३० नोव्हेंबर: लोकसभेच्या कामकाजाने विशेष अधिवेशनाला सुरुवात होणार.

२ डिसेंबर: राज्यसभेचे कामकाज सुरू होणार.

३ डिसेंबर: शासकीय कामकाजाच्या उपलब्धतेनुसार अधिवेशन संपण्याची शक्यता.

विधेयक घटनादुरुस्ती विधेयक असल्यामुळे आवश्यक संख्याबळ ३६०

भाजप: २४१, तेलुगू देसम पक्ष: १६, शिवसेना (एकनाथ शिंदे) : १३, जनता दल (युनायटेड) : १२, लोक जनशक्ती पक्ष (राम विलास) : ५, जनता दल (धर्मनिरपेक्ष) : २, जनसेना पक्ष : २, राष्ट्रीय लोकदल : २, अपना दल (एस) : १, आसाम गण परिषद : १, एजेएसयू पक्ष : १, हिंदुस्तानी अवाम मोर्चा : १, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) : १, सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा : १, यूपीपीएल : १, एनसीपीआय (तृणमूलमधून बाहेर पडलेले) : २०, शिरोमणी अकाली दल : १, एकूण ३२१

एनडीएबाहेरील संभाव्य समर्थक (मागील वेळी मदत केलेले)

वायएसआर काँग्रेस – ४, अपक्ष – १ हे धरून एकूण संख्याबळ – ३२६

द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), यांचे समर्थन मिळण्याची शक्यता, ते मिळाल्यास द्रमुक – २२, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) – ८, एकूण संभाव्य म्हणजे एकूण संख्याबळ – ३५६, डिलिमिटेशन म्हणजे लोकसंख्येतील बदलानुसार लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या सीमा आणि जागांची संख्या पुन्हा निश्चित करण्याची घटनात्मक प्रक्रिया होय. भारतीय निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, या प्रक्रियेला मराठीत 'मतदारसंघ पुनर्रचना' असे म्हणतात. नवीन जनगणनेची वाट न पाहता २०११ च्या जनगणनेच्या किंवा सरकारने निश्चित केलेल्या आकडेवारीच्या आधारे ही पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव या विधेयकात मांडण्यात आला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांतील शासकीय तलावांच्या जमिनी भाडेपट्ट्याने मिळणार; मका, ज्वारीसह चारा पिकांना परवानगी

दुष्काळात शेतकरी आणि पशुपालकांना मोठा दिलासा; तलावांतील गाळपेरा जमिनीवर चारा उत्पादनाची संधी!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर – (जिमाका) २७ : दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी चारा उपलब्ध व्हावा आणि शेतकरी व पशुपालकांना चारा उत्पादनाची संधी मिळावी, यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीतील लघुपाटबंधारे तलाव, साठवण तलाव, पाझर तलाव, गाव तलाव, माजी मालगुजारी तलाव आणि कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांमधील पाणीसाठा कमी झाल्याने उघड्या पडलेल्या गाळपेरा जमिनीवर चारा पिकांची लागवड करण्यास शासनाने परवानगी दिली आहे. या जमिनी इच्छुक शेतकरी, पशुपालक आणि सहकारी संस्थांना भाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

मृद व जलसंधारण विभागाने ५ नोव्हेंबर २०२६ रोजी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला आहे. राज्यातील दुष्काळी घोषित ३०४ तालुक्यांमध्ये या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांमधील पात्र जलसाठ्यांच्या गाळपेरा जमिनींचा यासाठी विचार केला जाणार आहे.

कोणत्याजमिनी मिळणार?

तलावाची पूर्ण संचय पातळी (ऋडड) आणि सर्वेक्षणाच्या दिवशीची प्रत्यक्ष पाणीपातळी यांदरम्यान पाणी कमी झाल्याने उघड्या पडलेल्या आणि लागवडीयोग्य जमिनीच गाळपेरा क्षेत्र म्हणून निश्चित केल्या जाणार आहेत. संबंधित तलावांची संयुक्त पाहणी करून उपलब्ध क्षेत्र, भूखंडांची संख्या, क्षेत्रफळ आणि ऋझड नोंदी तयार केल्या जाणार आहेत.

मात्र, ग्रामीण किंवा नागरी पाणीपुरवठ्यासाठी पाणी आरक्षित असलेल्या तसेच टँकर भरण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तलावांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य असेल. दुरुस्ती, गाळ काढणे किंवा पुनर्स्थापनेची कामे सुरू अथवा प्रस्तावित असलेल्या तलावांचे संबंधित क्षेत्र वाटपासाठी उपलब्ध करून दिले जाणार नाही.

मका, ज्वारी, बाजरीसह चारा पिके घेता येणार

गाळपेरा जमिनीवर अल्प कालावधीत तयार होणारी चारा पिके घेता येणार आहेत. यामध्ये मका, ज्वारी, बाजरी, न्यूट्रीफीड, बरसीम आणि ओट यांचा समावेश आहे. मुरघास निर्मितीसाठी मका आणि ज्वारी या पिकांना प्राधान्य देण्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. मात्र, या जमिनीवर ऊस, फळपिके, बहुवार्षिक पिके तसेच अन्नधान्य आणि नगदी पिकांची लागवड करता येणार नाही. चारा पिकांची काढणी पूर्ण करून ३१ मे २०२७ पूर्वी जमीन विभागाच्या ताब्यात परत करणे बंधनकारक आहे. पाणीपातळी वाढल्याने उभे पीक पाण्याखाली गेल्यास नुकसानभरपाई मिळणार नाही.

अर्ज कुठे आणि कसा करायचा?

संबंधित तलावांमधील उपलब्ध गाळपेरा क्षेत्राची गावनिहाय यादी कार्यकारी अभियंत्यांकडून तहसीलदारांना दिली जाणार आहे. त्यानंतर तहसीलदार गावचावडी, ग्रामपंचायत कार्यालय, तहसील कार्यालयातील सूचना फलक आणि दवंडीद्वारे क्षेत्र, खंड, भाडेदर, कालावधी आणि अर्जाची अंतिम मुदत जाहीर करतील. अर्जासाठी किमान १५ दिवसांचा कालावधी देणे आवश्यक आहे.

३१ मे २०२७ पूर्वी जमीन परत करावी लागणार; जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे वाटपाची जबाबदारी

इच्छुक व्यक्ती किंवा सहकारी संस्थांनी शासन निर्णयातील परिशिष्ट-डमधील विहित नमुन्यात संबंधित तहसीलदारांकडे अर्ज करायचा आहे. अर्जासोबत रहिवासी दाखला, सातबारा व आठ-अ उतारा किंवा भूमिहीन असल्याचा दाखला, आधार क्रमांक, आवश्यकतेनुसार जात प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र तसेच सहकारी संस्था असल्यास नोंदणी प्रमाणपत्र व सभासदांची यादी जोडावी लागणार आहे.

तलाठी आणि मंडळ अधिकारी अर्जांची छाननी करून अर्जदाराचे भूमिहीनत्व, रहिवास, प्रकल्पग्रस्त असल्याचा दावा आणि कुटुंबाचे एकूण धारणक्षेत्र यांची पडताळणी करतील. त्यानंतर अग्रक्रमानुसार तात्पुरती यादी प्रसिद्ध करून सात दिवस हरकती मागविण्यात येतील. हरकतींचा निपटारा झाल्यानंतर अंतिम यादी तयार केली जाईल. आवश्यकतेनुसार सोडत पद्धतीने वाटप करण्यात येईल. तहसीलदारांच्या प्रस्तावावर जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत अधिकारी भाडेपट्टा मंजुरीचा आदेश देतील.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती

गाळपेरा जमिनीचे वाटप, लाभार्थी निवड, समन्वय आणि देखरेख करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती कार्यरत राहणार आहे. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी, तर सहअध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद असतील. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी हे सदस्य असतील. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हे सदस्य सचिव असतील.

ही समिती प्रकल्पनिहाय उपलब्ध गाळपेरा क्षेत्राचा आढावा घेऊन वाटपाला मान्यता देईल. लाभार्थ्यांची निवड, प्रत्येक लाभार्थ्याला द्यावयाच्या क्षेत्राची कमाल मर्यादा आणि तक्रारींचे निराकरण करण्याची जबाबदारीही समितीवर असेल. वाटपाच्या कालावधीत समितीची बैठक किमान दर १५ दिवसांनी घेणे बंधनकारक आहे.



पाणी उपसा आणि शेतीसाठी कठोर अटी

चारा पिकांची लागवड प्रामुख्याने तलावातील उघड्या पडलेल्या जमिनीच्या शिल्लक ओलाव्यावर करावी लागणार आहे. पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी आवश्यक पाण्याचे आरक्षण केल्यानंतर अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध असल्यासच कार्यकारी अभियंत्यांच्या लेखी परवानगीने संरक्षित सिंचन करता येईल. त्यासाठी ठिबक किंवा तुषार सिंचनाला प्राधान्य द्यावे लागेल. प्रवाही सिंचनास मनाई असेल.

धरणातील पाणी मृतसाठ्याच्या पातळीपर्यंत पोहोचल्यास किंवा पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित पातळी गाठल्यास सिंचनासाठी पाणी उपसा करता येणार नाही. बुडीत क्षेत्रात नवीन विहीर, बोअरवेल, शेततळे किंवा पाणी साठविण्यासाठी खड्डे खोदण्यासही परवानगी नसेल.

२० सेंटीमीटरपेक्षा खोल नांगरणीला मनाई

गाळपेरा जमिनीची मशागत जास्तीत जास्त २० सेंटीमीटर खोलीपर्यंतच करता येईल. गाळ, माती, मुरूम किंवा वाळूचे उत्खनन आणि वाहतूक करण्यास सक्त मनाई आहे. नांगरणी व पेरणी समपातळी रेषांना समांतर करावी लागेल. तलावाच्या बुडीत क्षेत्रात कायम स्वरूपी किंवा तात्पुरते बांधकाम, कुंपण, बांध, रस्ता, झोपडी किंवा वृक्षलागवड करता येणार नाही.

धरणाच्या भिंतीवरून ट्रॅक्टर किंवा अवजड वाहनांची वाहतूक करण्यास मनाई आहे. तसेच पीक काढणीनंतर पिकांचे अवशेष जाळता येणार नाहीत. जलाशयाचे प्रदूषण टाळण्यासाठी सेंद्रिय खतांच्या वापरास प्राधान्य देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

अटींचा भंग केल्यास परवानगी रद्द

लाभार्थ्यांना भूखंडाचा ताबा देण्यापूर्वी शासनाने निश्चित केलेल्या तांत्रिक अटी मान्य असल्याचे हमीपत्र सादर करावे लागेल. भाडेपट्ट्याची जमीन विकता, गहाण ठेवता किंवा दुसऱ्याला पोटभाड्याने देता येणार नाही. तसेच शासनाच्या सार्वजनिक कामासाठी जमीन आवश्यक झाल्यास ३० दिवसांची नोटीस देऊन कोणत्याही मोबदल्याशिवाय जमीन परत घेण्याची तरतूद करारपत्रात आहे.

शासनाने घालून दिलेल्या अटींचे उल्लंघन झाल्यास कार्यकारी अभियंता संबंधित लाभार्थ्याची परवानगी तात्काळ रद्द करू शकतात. जलाशय किंवा धरणाच्या संरचनेचे नुकसान झाल्यास दुरुस्तीचा खर्च संबंधित लाभार्थ्याकडून वसूल केला जाणार आहे. दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याबरोबरच तलावांच्या पाण्याखाली गेलेल्या जमिनीचा मर्यादित आणि नियोजनबद्ध वापर करण्याचा या निर्णयाचा उद्देश आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील पात्र तलावांमध्ये प्रत्यक्ष किती गाळपेरा क्षेत्र उपलब्ध होते आणि त्याचा किती शेतकरी व पशुपालकांना लाभ मिळतो, याकडे आता लक्ष लागले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

पराभवातही कार्यकर्त्याची क्षमता ओळखणारे सचिनदादा, राजू अण्णांना दिले जिल्हास्तरीय नेतृत्व...!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सतीश पालापुरे,अक्कलकोट – राजकारणात मोठी पदे मिळविण्यासाठी राजकीय वारसा,आर्थिक ताकद आणि प्रस्थापित नेत्यांचे पाठबळ आवश्यक असते,असे अनेकदा मानले जाते.मात्र,राजकारणात सामान्य घरातून आलेल्या कार्यकर्त्यालाही योग्य वेळी संधी,विश्वास आणि नेतृत्वाची साथ मिळाली तर तो मोठी झेप घेऊ शकतो,याचे उदाहरण म्हणजे राजेंद्र बंदीछोडे अर्थात राजू अण्णा यांचा राजकीय प्रवास ..!अक्कलकोट तालुक्यातील वागदरी जिल्हा परिषद गटातील एका छोट्याशा गावातून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदापर्यंत पोहोचला आहे.या प्रवासात आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी दिलेली भक्कम साथ आणि दाखविलेला विश्वास विशेष उल्लेखनीय ठरतो.



राजकारणाची कोणतीही मोठी पार्श्वभूमी नसताना धनगर समाजातील एका सर्वसामान्य कुटुंबातून राजेंद्र बंदीछोडे यांनी आपल्या राजकीय वाटचालीला सुरुवात केली.माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे एकहाती वर्चस्व असलेल्या राजकीय वातावरणात भारतीय जनता पक्षाचा झेंडा नेटाने फडकवत त्यांनी सरपंचपदापर्यंत मजल मारली. प्रस्थापित राजकीय समीकरणांमध्ये स्वतःचे स्थान निर्माण करण्यासाठी त्यांनी स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांची बांधणी केली.याच काळात त्यांच्या कामाची पद्धत,लोकांशी असलेला संपर्क आणि राजकीय इच्छाशक्ती आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या नजरेत आली.

राजकारणात अनेक नेते आपल्या जवळच्या लोकांना संधी देतात मात्र सामान्य कार्यकर्त्यांमधील क्षमता ओळखून त्यांना जबाबदारी देणे आणि त्या जबाबदारीतून मोठे करणे,ही नेतृत्वाची वेगळी ओळख असते.सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या राजकीय कार्यशैलीत ही बाब प्रकर्षाने दिसून येते.राजेंद्र बंदीछोडे यांच्यातील संघटन कौशल्य आणि काम करण्याची जिद्द ओळखून त्यांनी त्यांना राजकीय बळ दिले.एकवेळ पंचायत समिती सदस्य राहिलेले राजू आण्णा यांना दादांनी पुढे अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकपदाची संधी देत त्यांच्या राजकीय प्रवासाला नवे व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

गावातील सरपंचपदाच्या निवडणुकीत राजू अण्णांच्या पॅनलला पराभवाचा सामना करावा लागला.त्यानंतर नऊ महिन्यापुर्वी झालेल्या पंचायत समिती निवडणुकीतही त्यांना पराभव स्वीकारावा लागला.मात्र,निवडणुकीतील पराभव म्हणजे राजकीय कारकीर्द संपली,असे मानणाऱ्यांपेक्षा पराभवानंतरही कार्यकर्त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवणारे नेतृत्व वेगळे ठरते.सचिनदादांनी राजू अण्णांना केवळ निवडणुकीतील विजय-पराजयाच्या निकषावर न पाहता त्यांच्या कामाची क्षमता आणि राजकीय भवितव्य लक्षात घेऊन संधी दिली...

राजेंद्र बंदीछोडे यांना मिळालेल्या संधीचे त्यांनीही सोने केले.पंचायत समिती सदस्य म्हणून काम करण्याची संधी,अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालकपद आणि आता सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदापर्यंतचा त्यांचा प्रवास राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

विशेष म्हणजे,जिल्हा बँकेच्या संचालकपदाच्या राजकीय लढतीत त्यांच्यासमोर सांगोला तालुक्यात दीर्घकाळ नेतृत्व केलेले माजी आमदार गणपतराव देशमुख यांचे नातू डॉ.अनिकेत देशमुख यांच्यासारखे राजकीय वारसा असलेले प्रतिस्पर्धी होते. अशा लढतीत राजेंद्र बंदीछोडे यांनी मिळविलेला विजय त्यांच्या राजकीय वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.एका छोट्या गावातील कार्यकर्त्याने मोठ्या राजकीय पार्श्वभूमीच्या प्रतिस्पर्ध्याला पराभूत करणे,ही बाब त्यांच्या आत्मविश्वासाला आणि राजकीय अस्तित्वाला नवी ओळख देणारी आहे...

या संपूर्ण प्रवासात सचिनदादांचे पाठबळ हा एक महत्त्वाचा घटक राहिला.सामान्य कार्यकर्त्याला संधी देणे,त्याच्यावर विश्वास ठेवणे,त्याला राजकीय व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि जबाबदारीतून त्याला सक्षम बनविणे,या नेतृत्वगुणांमुळे सचिनदादांच्या भोवती नव्या कार्यकर्त्यांची फळी उभी राहत असल्याचे चित्र दिसते...

राजकारणात एखाद्याला पद देणे ही एक बाब असते मात्र त्या पदाच्या माध्यमातून त्याची स्वतंत्र ओळख निर्माण होण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे ही त्याहून मोठी बाब असते.राजेंद्र बंदीछोडे यांच्या वाटचालीकडे पाहिले तर स्थानिक राजकारणातून जिल्हास्तरीय सहकार क्षेत्रापर्यंत पोहोचण्याची त्यांची झेप लक्षवेधी आहे.धनगर समाजातील एका सामान्य कुटुंबातून आलेल्या कार्यकर्त्याला जिल्हा बँकेच्या संचालकपदापर्यंत पोहोचण्याची संधी मिळणे,हे स्थानिक राजकारणातील बदलत्या नेतृत्वाचेही चित्र आहे.

राजू अण्णांचा हा प्रवास व सचिनदादा कल्याणशेट्टी यांची राजकीय ताकद केवळ निवडणुका जिंकण्यात नसून,आपल्या सोबत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी देऊन त्यांचे नेतृत्व विकसित करण्यातही आहे,असा या प्रवासातून राजकीय संदेश मिळतो.

गावच्या राजकारणातून सुरुवात करून पंचायत समिती,कृषी उत्पन्न बाजार समिती आणि आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदापर्यंत पोहोचलेले राजेंद्र बंदीछोडे यांच्यासाठी ही निवड निश्चितच नवी जबाबदारी आहे.आता या संधीचे रूपांतर सहकार क्षेत्रातील प्रभावी कामगिरीत करण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असेल.मात्र,एका छोट्या गावातील सामान्य कार्यकर्त्याला जिल्हास्तरावर ओळख मिळवून देणाऱ्या या प्रवासात सचिनदादांची साथ महत्त्वाचे आहे.

निफाड नगर पंचायतीच्या नगराध्यक्षपदी नयना निकाळे यांची निवड



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड प्रतिनिधी – निफाड नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष अलका निकम यांनी दि. ०४/११/२०२६ रोजी नगराध्यक्ष पदाचा स्वखुशीने मा. जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे राजीनामा दिला असल्याने निफाड नगरपंचायत करिता अध्यक्ष पदासाठी निवडणूक प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. त्यानुसार निफाड नगरपंचायत अध्यक्ष पदाची निवड करणे करिता विशेष सभा, निफाड नगरपंचायत सभागृहात गुरुवार दि. २६/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेकरिता एकूण ११ नगरसेवक / नगरसेविका उपस्थित होते. सभेचे अध्यक्ष म्हणून पीठासीन अधिकारी तहसीलदार. विशाल नाईकवाडे, यांनी निवडणुकीचे कामकाज पार पाडले. असून निफाड नगरपंचायत मुख्याधिकारी धीरज भामरे यांनी प्रस्तावित करून कामकाजाचे स्वरूप सभेला सांगितले. निफाड नगरपंचायत अध्यक्ष पदाकरिता सौ. नयना सुनिल निकाळे यांचा एकच अर्ज प्राप्त असल्यामुळे सौ. नयना सुनिल निकाळे यांची नगरपंचायत अध्यक्ष पदाकरिता बिनविरोध निवड झाल्याचे मा. पीठासीन अधिकारी यांनी सभेत जाहीर केले. या प्रसंगी निफाड नगर पंचायतीचे उपनगराध्यक्ष अनिल पा कुंदे, तसेच नगरसेविका / नगरसेवक, व शिवाजी राजे ढेपले, मधुकर शेलार,कॉग्रेसचे तालुका अध्यक्ष साहेबराव ढोमसे, तन्वीर राजे, सुहास सूरळीकर, सचिन खडताळे, संजय अहिरे, तसेच निफाड नगरपंचायत चे पदाधिकारी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते, उपस्थितांचे वतीने नगराध्यक्षा नयना सुनील निकाळे यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तांदुळवाडी येथे संविधान दिन उत्साहात



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब (प्रतिनिधी) : सुधाकर रणदिवे , जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तांदुळवाडी येथे संविधान दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. संविधानातील मूल्यांची विद्यार्थ्यांमध्ये रुजवणूक व्हावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उपक्रमशील शिक्षिका श्रीमती आशा मनोहर पवार यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचे महत्त्व सोप्या भाषेत समजावून सांगितले. संविधानाने दिलेल्या हक्कांइतकीच कर्तव्येही महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सहशिक्षक श्री. संतोष मोहिते यांनी भारतीय संविधानाच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे असलेले अमूल्य योगदान अधोरेखित केले. संविधानाची मूल्ये जोपासणे आणि ते जपण्याचे कार्य प्रत्येकाने करावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

श्रीमती रसिका आगरकर यांनी बदलत्या काळात संविधान ही काळाची गरज कशी आहे आणि आजच्या युगात संविधानाचे महत्त्व काय आहे, याविषयी विद्यार्थ्यांना सखोल व मार्गदर्शक माहिती दिली.

कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांशी संवाद

संविधान उद्देशिका वाचन, संविधानाच्या मूल्यांवर चर्चा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी मिलिंद जाधव – भारतीय संविधानातील लोकशाही मूल्ये, मूलभूत अधिकार, कर्तव्ये, सामाजिक समता आणि बंधुतेची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, या उद्देशाने लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्ट आणि पडघा केंद्रांतर्गत जिल्हा परिषद बोरीवली उर्दू शाळेच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर २०२६ रोजी ७७ वा भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या शैक्षणिक परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व समजावून सांगणे आणि संवैधानिक मूल्यांचे आचरण करण्याची जाणीव निर्माण करणे, हा या उपक्रमाचा उद्देश होता.कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने झाली. यावेळी लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष तथा कवी मिलिंद जाधव यांनी संविधानातील महत्त्वपूर्ण तरतुदी, मूलभूत अधिकार आणि समानता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुता या मूल्यांची माहिती पोस्टरच्या माध्यमातून दिली. तसेच भारतीय संविधानावर कविता सादर करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तर कमलेश जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.विद्यार्थ्यांनीही मूलभूत अधिकार व संवैधानिक मूल्यांवर आधारित पोस्टर सादर करून शिक्षणाचा अधिकार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समानता आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला. शासनाच्या निर्देशानुसार संविधान उद्देशिका वाचन, संविधान प्रचार रॅली, चित्रकला स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धा असे विविध उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



यावेळी लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव, सामाजिक कार्यकर्ते कमलेश जाधव, बोरीवली उर्दू शाळेचे मुख्याध्यापक जुबेर खान, सहशिक्षक फिरोज खान, शाजिया शेख, अंजुम अन्सारी, सईदा बानो, शाहीन सिद्दिकी, शहाबाज अन्सारी, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा जहिरा शेख यांच्यासह शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी बनावट कहाणी रचल्याचा गंभीर प्रकार

नैताळेत गावठी पिस्तुलाचा थरार! पिस्तूल तपासताना गोळी सुटली; स्विफ्ट कारमध्ये बसलेल्या तरुणाच्या कमरेजवळ गोळी लागून जखमी!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड । प्रतिनिधी – निफाड तालुक्यातील नैताळे गावात बेकायदेशीर गावठी पिस्तुलाच्या व्यवहारातून धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पिस्तूल खरेदी करण्यासाठी त्याची तपासणी सुरू असतानाच अचानक ट्रिगर दाबला गेला आणि गोळी थेट सुटली! ही गोळी स्विफ्ट कारच्या पुढील सीटवर बसलेल्या तरुणाच्या कमरेजवळ लागून तो जखमी झाला. विशेष म्हणजे, हा केवळ निष्काळजीपणाचा प्रकार नसून बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगणे, त्याची खरेदी-विक्री करण्याचा प्रयत्न आणि त्यानंतर पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी बनावट कहाणी रचल्याचा गंभीर प्रकार पोलिस तपासात समोर आला आहे.



मिळालेल्या पोलीस माहितीनुसार, २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास नैताळे गावातील गाजरवाडी रोडवरील गुरुदत्त इलेक्ट्रॉनिक्स दुकानासमोर हा प्रकार घडला. आरोपी श्रावण सुरेश पिंपळे आणि राधाकिसन रतन जाधव यांनी कोणताही परवाना नसताना गावठी पिस्तूल बेकायदेशीररीत्या ताब्यात ठेवल्याचा आरोप आहे. आरोपी राधाकिसन रतन जाधव हा पिस्तूल खरेदी करण्याच्या उद्देशाने त्याची तपासणी करत असताना त्याच्याकडून ट्रिगर दाबला गेला आणि गोळी झाडली गेली. या गोळीमुळे स्विफ्ट कारमध्ये पुढील सीटवर बसलेल्या श्रावण पिंपळे याच्या कमरेजवळ दुखापत झाली.

मात्र, गोळीबारानंतर प्रकरण आणखी गंभीर बनल्याचे तपासात पुढे आले. आरोपी क्रमांक ३ आणि ४ यांनी इतर आरोपींशी संगनमत करून घडलेल्या घटनेबाबत पोलिस आणि डॉक्टरांना खोटी माहिती देत दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे तर, पिस्तुलाची विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने ते शस्त्र आरोपी वैभव याने कमलेश सुरेश पिंपळे याच्याकडे दिल्याचे पोलिस तपासात नमूद आहे.

त्यानंतर बनावट हकीकत तयार करण्यासाठी पिस्तुलातून बाहेर पडलेली रिकामी पुंगळी वडाच्या झाडाखाली ठेवण्यात आली आणि राहुल बबन वाघमारे याचे नाव पुढे करून खोटी कहाणी रचल्याचा गंभीर आरोप आहे. म्हणजेच, बेकायदेशीर शस्त्राचा व्यवहार, गोळीबार, पुरावा लपविण्याचा प्रयत्न आणि पोलिसांची दिशाभूल अशा अनेक बाबी या प्रकरणात समोर आल्या आहेत.

नेमका प्रश्न असा की, गावठी पिस्तूल आले कुठून? त्याची विक्री कोण करणार होते? या शस्त्राचे आणखी काही व्यवहार झाले आहेत का? आणि गोळीबारानंतर खोटी कहाणी रचून दुसऱ्याला गोवण्याचा प्रयत्न का करण्यात आला? या सर्व प्रश्नांची उत्तरे आता पोलीस तपासातून समोर येणे आवश्यक आहे.

या प्रकरणी निफाड पोलीस ठाण्यात गुरनं. ४१४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १२५ (ब), ३(५), भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५, ५/२७ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१), (३) चे उल्लंघन केल्याप्रकरणी कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास

नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, अपर पोलीस अधीक्षक विमला एम., स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल मोरे आणि निफाड उपविभागीय पोलीस अधिकारी के. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सारिका अहिरराव, पोलीस कर्मचारी कपालेश्वर ढिकले, धनंजय जाधव, अरविंद ढवळे आणि नितीन सांगळे राजेंद्र दरोडे स्वप्निल शिरसाट पुढील तपास करीत आहेत.

गावठी कट्टे आणि बेकायदेशीर शस्त्रांचे व्यवहार ग्रामीण भागात किती खोलवर पोहोचले आहेत, याची गंभीर जाणीव करून देणारी ही घटना आहे. गोळी झाडल्यानंतर खोटी कहाणी रचून सत्य दडपता येत नाही. आता या पिस्तुलाचा मूळ स्रोत, त्यामागील व्यवहार आणि या प्रकरणातील प्रत्येकाची भूमिका तपासातून उघड होणे गरजेचे आहे.

केसरी रेशन कार्डधारकांना पुढील तीन महिने प्रतिव्यक्ती पाच किलो मोफत अन्नधान्य; आधार सीडिंग तातडीने पूर्ण करा : जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

टंचाईच्या पार्श्वभूमीवर ९० कोटी ६७ लाखांचा कृती आराखडा; आज रोजी २८० टँकरने पाणीपुरवठा सुरू तसेच टँकरची मागणी आल्यास ४८ तासांत मंजुरी देण्याचे निर्देश



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर, (जि. मा. का.) : जिल्ह्यातील टंचाई परिस्थितीचा सामना करण्यासाठी पाणीपुरवठा, चारा उपलब्धता आणि जलस्रोतांचे नियोजन प्राधान्याने करावे. केसरी रेशन कार्डधारकांना शासन निर्णयानुसार पुढील तीन महिन्यांसाठी प्रतिव्यक्ती पाच किलो मोफत अन्नधान्याचे वितरण करण्यात यावे. यासाठी उर्वरित लाभार्थ्यांचे आधार सीडिंग तातडीने पूर्ण करून घ्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात टंचाईच्या अनुषंगाने आयोजित विविध विभागांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, लाभक्षेत्र प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता सुभवेंद्र खांडेकर, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) अंजली मरोड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक लांडगे, भूजल विभागाचे वरिष्ठ वैज्ञानिक मुस्ताक शेख, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व्ही. डी. राठोड, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका अशीच लोकरे, सहाय्यक नियोजन अधिकारी प्रीतम कुंटला यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

केसरी कार्डधारकांना मोफत अन्नधान्य-

जिल्ह्यात ०३ लाख २५ हजार केसरी रेशन कार्डधारक असून, त्यापैकी सुमारे ४० टक्के लाभार्थ्यांचे आधार सीडिंग पूर्ण झाले आहे. उर्वरित ६० टक्के लाभार्थ्यांनी तातडीने आधार सीडिंग करून घ्यावे. यासाठी सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांनी गावपातळीवर विशेष शिबिरांचे आयोजन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

जिल्ह्यात अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत सुमारे १६ लाख ५० हजार लाभार्थ्यांना दरमहा मोफत अन्नधान्य वितरित केले जाते. त्याचप्रमाणे २५ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार टंचाईची परिस्थिती अनुषंगाने केसरी रेशन कार्डधारकांनाही पुढील तीन महिन्यांसाठी प्रतिव्यक्ती पाच किलो मोफत अन्नधान्याचा लाभ देण्यात येणार आहे.

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी जिल्ह्याचा टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन ८५३ गावे आणि २५५ वाड्यांसाठी एकूण ४ हजार ४४८ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. यासाठी ९० कोटी ६७ लाख रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत जिल्ह्यातील २१६ गावांमध्ये २८० टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. टँकर सुरू करण्याची मागणी प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करावी. कोणत्याही परिस्थितीत मागणी प्राप्त झाल्यानंतर ४८ तासांच्या आत टँकरला मंजुरी मिळेल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

जलजीवन मिशनअंतर्गत ७५ ते ९९ टक्के कामे पूर्ण झालेल्या योजनांची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने शासनाकडे ४८ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करावी. या योजना पूर्ण झाल्यानंतर टँकरची संख्या किती प्रमाणात कमी होऊ शकते, याची माहितीही सादर करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

चारा उपलब्धतेसाठी पाच कोटींचे नियोजन

जिल्ह्यातील चारा टंचाई लक्षात घेऊन जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पशुसंवर्धन विभागाला पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यापैकी दोन कोटी रुपयांतून चारा निर्मिती करण्यात आली असून, तीन कोटी रुपयांच्या निधीतून बियाणे खरेदी करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामधून आगामी काळात तीन लाख ७६ हजार मेट्रिक टन चारा उपलब्ध होणार आहे.

तसेच जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून मिशन मुरघास योजना जिल्ह्यातील ६३ गावांमध्ये प्रातिनिधिक स्वरूपात राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पशुपालकांची निवड करून योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

उजनी धरणासह जिल्ह्यातील मध्यम व लघु प्रकल्पांमधील पाणीसाठ्याचा आढावा घेऊन पाण्याचे काटेकोर नियोजन करावे. ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणी उपलब्ध राहील, या दृष्टीने पाणीवापराचे नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या.

याशिवाय दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन समिती मधून विविध विभागांना दुष्काळी उपाय योजना साठी देण्यात येणाऱ्य निधी, पीक कर्ज पुनर्गठन, पीक कर्ज वाटप, कर्जमाफी, पीक विमा, पीक कापणी प्रयोग, शेततळ्यांचे पंचनामे आदी विषयांचाही जिल्हाधिकारी यांनी सविस्तर आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना दिल्या.

बैठकीस सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, नगरपालिकांचे मुख्याधिकारी, तालुका कृषी अधिकारी तसेच संबंधित यंत्रणांचे तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

पंढरपूर तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा





दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाहीची मूलभूत मूल्ये प्रदान केली आहेत. देशाची लोकशाही व्यवस्था अधिक सक्षम आणि बळकट करण्यामध्ये संविधानाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त पंढरपूर तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



पंढरपूर येथील प्रांताधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, नगरपरिषद यांसह विविध शासकीय कार्यालयांमध्ये संविधान दिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

प्रांताधिकारी कार्यालयात प्रांताधिकारी सचिन इतापे तर नगरपरिषद कार्यालयात मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या उपस्थितीत संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामूहिकरीत्या उद्देशिकेचे वाचन करून संविधानातील मूल्यांचे पालन करण्याचा संकल्प केला.

तसेच, २६ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शहीद जवानांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाप्रती आदर व्यक्त करत लोकशाही मूल्यांच्या जतनाचा संदेश दिला.

मोहा शाळेत संविधान दिनाचा उत्साह, विद्यार्थ्यांनी सांगितले संविधानाचे महत्त्व

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब (प्रतिनिधी) – कळंब तालुक्यातील मोहा येथे दि. २६ नोव्हेंबर रोजी जि.प. केंद्रीय प्रा. शाळा मोहा या ठिकाणी संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

श्री. गुंठाळ सर यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिनानिमित्त मार्गदर्शन केले. संविधान निर्मिती, त्यातील समित्या, महत्त्वाची मसुदा समिती, त्याचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान, राज्यघटनेत समाविष्ट मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये, मार्गदर्शक तत्त्वे याबद्दल त्यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांची संविधान दिनाबद्दल भाषणे



घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून संविधानाचे महत्त्व सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवर ऑल इंडिया पँथर सेना धाराशिव जिल्हा अध्यक्ष श्री. अशोक कसबे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक तालुका अध्यक्ष कळंब मा. अमर मडके, लोक जनशक्ती पार्टी युवक जिल्हाध्यक्ष धाराशिव बाबा कसबे, अश्रुबा नागटीळक, सागर पाटील व शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. भिंगारे मॅडम, श्री. अशोक डिकले यांनी संविधान उद्देशिका यांचे वाचन केले.

गावातून संविधान फेरी काढून शेवटी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी मोहा यांच्यातर्फे मुलांना खाऊ वाटप केले. या वेळी शाळेतील सर्व शिक्षक स्टाफ व विद्यार्थी उपस्थित होते.



गौर येथे संविधान दिन उत्साहात साजरा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील गौर येथे दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान दिनानिमित्त माननीय समता सैनिक दलाचे तालुकाप्रमुख प्रदीप कुमार ताकपिरे यांनी संविधानाची प्रस्तावना करून समता नगर मधील पंचशील तरुण मंडळातील कार्यकर्ते महिला भगिनी यांना मार्गदर्शन करून संविधान दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देऊन संविधान दिन मोठ्या आनंदाने व उत्साहाने मोठ्या संख्येने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार विकास धर्मा सोनवणे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी संविधान प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि सकारात्मक कार्यसंस्कृतीवर भर

'एसव्हीआयटी २.०' च्या माध्यमातून संस्थेच्या विकासाचा संकल्प

स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या प्राचार्यपदी डॉ. प्रशांत पवार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील अल्पावधीत नावारूपास आलेल्या एसव्हीआयटी तथा स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या प्राचार्य पदाचा पदभार ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व संशोधक डॉ. प्रशांत मारुती पवार यांनी नुकताच स्वीकारला. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बी. पी. रोंगे, सचिव अशोक भोसले, उपाध्यक्ष एच. एम. बागल, खजिनदार बी. डी. रोंगे, विश्वस्त एस.टी.राऊत, विश्वस्त आर.बी.रिसवडकर व गव्हर्निंग बॉडीचे सदस्य डॉ. उल्हास शिउरकर यांच्या हस्ते स्वामी



विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या प्राचार्य पदाचा पदभार देऊन तरुण संशोधक डॉ. प्रशांत पवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी लीना इंजिनिअरिंग वर्क्सचे सीईओ पळसुले, डॉ.प्रकाश साळुंखे, प्राध्यापक वर्ग, इतर सदस्यांच्या उपस्थितीत डॉ. प्रशांत पवार यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संशोधक म्हणून राज्यात स्वतंत्र ओळख असलेले डॉ. प्रशांत पवार यांनी शिवाजी विद्यापीठातून सिव्हील इंजिनिअरिंग मध्ये पदवी पूर्ण करून पदव्युत्तर पदवी अर्थात एम.टेक हे भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) गुवाहाटी येथून पूर्ण केले तर भारतीय विज्ञान संस्था (आयआयएससी), बेंगळुरू येथून पीएच.डी. ही मानाची पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या पीएच.डी. प्रबंधाला उत्कृष्ट प्रबंधाचा पुरस्कार देखील मिळाला आहे. दक्षिण कोरियातील कोनकुक विद्यापीठात त्यांनी संशोधक प्राध्यापक म्हणूनही कार्य केले आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचा 'विश्वेश्वरय्या सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार' आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचा 'सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार' यांसह विविध सन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत. विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता म्हणूनही त्यांनी जबाबदारी यशस्वीरीत्या सांभाळलेली आहे. डॉ. पवार यांना अध्यापनासोबत संशोधन, शैक्षणिक प्रशासन आणि उद्योग-संस्था सहकार्याचा व्यापक अनुभव आहे. त्यांच्या संशोधन कार्यात आंतरराष्ट्रीय नियतकालिकांतील शोधनिबंध, नऊ पुस्तके आणि विविध पेटंट्सचा समावेश आहे, यांपैकी आठ पुस्तके स्प्रिंगर या आंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्थेने प्रकाशित केली आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नऊ विद्यार्थ्यांनी पीएच.डी., तर २९ विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. पूल व संरचनांची सुरक्षितता, ग्रामीण तंत्रज्ञान आणि समाजोपयोगी अभियांत्रिकी उपाययोजना ही त्यांच्या संशोधनाची प्रमुख क्षेत्रे आहेत. आयआयटी मुंबई आणि व्हीजेटीआय यांच्या सहभागातून महाराष्ट्रातील स्मार्ट ड्रोन परिसंस्थेशी संबंधित सुमारे ३३.७३ कोटी रुपयांच्या संयुक्त प्रकल्पातही त्यांचा सहभाग आहे. याशिवाय भाभा अणुसंशोधन केंद्राच्या सहकार्याने ग्रामीण तंत्रज्ञानाचा प्रसार, विविध संशोधन अनुदान प्रकल्प, सामाजिक उत्तरदायित्व निधीतून राबविलेले उपक्रम आणि अभियांत्रिकी सल्लागार सेवांमध्ये त्यांनी योगदान दिले आहे. संशोधनाचा उपयोग विद्यार्थी, उद्योग आणि ग्रामीण समाजाच्या गरजांसाठी करण्यावर त्यांनी सातत्याने भर दिला आहे. प्राचार्य पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर प्राध्यापकांशी संवाद साधताना डॉ. प्रशांत पवार यांनी संस्थेच्या विकासासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले तसेच शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, विद्यार्थी प्रवेश आणि संस्थेच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी 'एसव्हीआयटी २.०' च्या माध्यमातून नियोजनबद्ध प्रयत्न करण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला. संस्थेविषयी आत्मीयता बाळगून उपलब्ध क्षमतांचा प्रभावीपणे वापर करणे, मर्यादा ओळखून त्यावर ठोस उपाययोजना करणे आणि उत्साहाने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सकारात्मक दृष्टिकोन, परस्पर सहकार्य आणि कामातील समाधान यांच्या आधारे सक्षम कार्यसंस्कृती घडविण्यावर आपला भर राहील. व्यवस्थापन मंडळाच्या मार्गदर्शनाखाली पदविका अभ्यासक्रमांच्या चांगल्या निकालांची परंपरा कायम राखत पदवी अभ्यासक्रमांची शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थी प्रवेश वाढविण्यासाठी नियोजनबद्ध धोरण राबविण्यात येणार असल्याचे डॉ. प्रशांत पवार यांनी नमूद केले. अध्यापनातील गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा कौशल्यविकास आणि संशोधनाभिमुख वातावरण यांच्या माध्यमातून संस्थेची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख बळकट करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. यावेळी व्यवस्थापन मंडळातील पदाधिकारी उपस्थित होते.